# शेती मालाच्या निर्यातीला चालना देण्यासाठी केंद्र व महाराष्ट्र राज्य सरकारची उपाययोजना

**सुश्मिता दिलीप काळे, सहाय्यक अध्यापक (के.के.वाघ कृषी महाविद्यालय ,नाशिक) मो. नं. ९९२२४२६८१८**
**अतुल भाऊसाहेब घुले, महिंद्रा संशोधन केंद्र,चेन्नई (महिंद्रा आणि महिंद्रा लिमिटेड) मो. नं. ९८८४३०७८७८**

सरकार स्वदेशी, सेंद्रिय, पारंपारिक आणि शेतीच्या आधुनिक पद्धतीस प्रोत्साहित करीत आहे. यामुळे शेतकऱ्यांना निर्यातीचे प्रमाण सुधारण्यास, नवीन बाजारपेठांना काबीज करण्यास, सॅनिटरी आणि फायटोसॅनेटरी (वनस्पती रोग आणि रोगजनक ) समस्यांशी संबंधित असलेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी मजबूत चौकट विकसित करण्यात मदत होईल.

देशातील फळांच्या निर्यातीत महाराष्ट्राचा ६५ टक्के आणि भाजीपाला निर्यातीत ५५ टक्के हिस्सा आहे. मागील वर्षी २.५ लाख टन द्राक्ष ( २३०० करोड ) , सुमारे ५०,००० टन आंबा (४०६ करोड) तसेच ६७,००० टन डाळिंब (६८८ करोड ) निर्यात केले . १५ लाख टन कांद्याची निर्यात करून ३,५०० करोड उत्पन्न झाले. यासर्व गोष्टींमुळे महाराष्ट्र सरकार आपली निर्यात वाढवण्यास उत्सुक आहे.

डाळिंबाच्या निर्यातीसाठी सोलापूर, अहमदनगर आणि पुणे, त्याचप्रमाणे आंब्यांसाठी सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी; द्राक्षेसाठी नाशिक, पुणे आणि सांगली; कांद्यासाठी नाशिक; संत्रासाठी नागपूर, वर्धा आणि अमरावती; आणि केळ्यांसाठी जळगाव, कोल्हापूर आणि सोलापूर हे मोठ्या प्रमाणात परिचित आहेत . या तसेच इतर समूहांना प्रोत्साहन देण्यासाठी शेतकरी गट, उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांना राज्य कडून पायाभूत सुविधा आणि रसद यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ कार्यरत आहे.

त्यासाठीच रासायनिक-अवशेषमुक्त भाज्या व फळांच्या निर्यातीसाठी महाराष्ट्र सरकार(कृ.प्र.नि.वि. प्रा. सोबत ) राज्यात १८ ठिकाणी क्लस्टर स्थापन करण्याचा विचार करत आहे . कृषी उत्पादने विकसित देशांच्या फायटोसॅनेटरी निकषांची पूर्तता करतात कि नाही याची सुनिश्चित क्लस्टर्स द्वारे होईल. फायटोसॅनेटरी उपाय म्हणजे वनस्पती रोग आणि रोगजनकांवरील नियंत्रण.

अवशेष-मुक्त आणि फायटोसॅनेटरी प्रमाणपत्रांशिवाय विदेशी बंदरांवर सीमाशुल्क मंजूर करणे शक्य नाही.प्रत्येक जिल्ह्यात कोठार, वितरण केंद्रे, पॅकहाउस आणि गुणवत्ता चाचणी सुविधा याद्वारे राज्य सरकार कृषी व प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणासह कृषी निर्यात क्षमतेचे मूल्यांकन करेल.

**महाराष्ट्र राज्य कृषी निर्यात धोरणाचे व्यापक उद्दिष्टे**

✽महाराष्ट्र कृषि क्षेत्रात देशाचे निर्यातकेंद्र म्हणून बनविणे.

✽ महाराष्ट्र राज्याची कृषि निर्यातमधील उद्योजकता विकास.

✽ लक्ष केंद्रित करून उच्च मूल्य आणि मूल्यवर्धित कृषी निर्यातीला चालना देणे.

✽ देशी, सेंद्रिय, पारंपारीक आणि पारंपारिक कृषी उत्पादनांच्या निर्यातीला प्रोत्साहन देणे.

✽ कार्यक्षम निर्यातभिमुख पायाभूत सुविधा आणि विद्यमान पायाभूत सुविधांचा उपयोग.

✽ बाजारपेठेतील प्रवेश, अडथळ्यांना तोंड देण्यासाठी आणि सेनेटरी व फायटो-सेनेटरीच्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा प्रदान करणे.

✽ निर्यात बाजारात उत्पादन स्पर्धात्मक बनविण्यासाठी भागधारकांना पाठिंबा.

✽ कृषि निर्यात संबंधित भागधारकांचे कौशल्य विकास.

राज्यात एकूण २१ क्लस्टर स्थापन करण्याचा विचार करत आहे. पैकी १८ ठिकाणी मसाले,भाज्या व फळांच्या निर्यातीसाठी तर ३ क्लस्टर दुग्ध उत्पादने ,मत्स्यपालन व प्राणी उत्पादने संबंधित आहेत.

**जिल्ह्यांसह प्रस्तावित क्लस्टर:**

शेती मालाची निर्यात संदर्भात लागणाऱ्या आवश्यक माहितीसाठी खालील संकेत स्थळावर आवश्यक भेट द्या :

१.कृषी व प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (कृ.प्र . नि. वि. प्रा): https://apeda.gov.in/ apedawebsite

| अ.न. | उत्पादन | उप-गट आणि संरक्षित जिल्हे |
|---|---|---|
| १ | केळी | **ए-** जळगाव, धुळे, नंदुरबार.<br>बी.- कोल्हापूर, सोलापूर, पुणे<br>सी.- परभणी, हिंगोली, नांदेड<br>डी -अकोला, बुलडाणा, वर्धा |
| २ | डाळिंब | **ए.**-नाशिक,अहमदनगर,पुणे,सोलापूर,सांगली,लातूर, उस्मानाबाद,<br>**बी.** -वाशिम, बुलडाणा |
| ३ | अल्फोन्सो आंबा | **ए** -रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड |
| ४ | केसर आंबा | **ए**-औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, अहमदनगर,नासिक |
| ५ | संत्रा | **ए** -नागपूर, अमरावती, वर्धा, अकोला, बुलडाणा,वाशिम |
| ६ | द्राक्षे | **ए** -नाशिक, अहमदनगर, पुणे, सांगली, सोलापूर,उस्मानाबाद |
| ७ | कांदा | **ए** -धुळे, नाशिक, जळगाव, अहमदनगर, पुणे,सातारा, सोलापूर |
| ८ | काजू | **ए** - कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड,ठाणे, पालघर |
| ९ | फ्लोरीकल्चर | **ए** - पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक |
| १० | मनुका | **ए** - सांगली,<br>**बी.**- नाशिक |
| ११ | भाज्या | **ए** - जळगाव, नाशिक, पुणे, अहमदनगर,<br>**बी.**- ठाणे, पालघर, **सी.**- नागपूर |
| १२ | नॉन-बासमतीतांदूळ | **ए** - नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली,भंडारा,<br>**बी.**- पालघर, ठाणे, रायगड, पुणे |
| १३ | डाळ | **ए** -धुळे, जळगाव, अहमदनगर, पुणे,<br>**बी.**-औरंगाबाद,जालना,बीड,लातूर,नांदेड,परभणी, उस्मानाबाद,<br>**सी.**-अमरावती,अकोला,बुलडाणा,यवतमाळ,वर्धा,नागपूर,चंद्रपूर |
| १४ | तृणधान्ये | **ए** - जळगाव, नाशिक, औरंगाबाद, बीड,अहमदनगर, पुणे,<br>सातारा, सांगली, सोलापूर., **बी.**- गोंदिया, नागपूर |
| १५ | तेलबिया | **ए** -बुलडाणा,अकोला,वाशिम,अमरावती,यवतमाळ,वर्धा, नागपूर,<br>**बी.**- नाशिक, जळगाव, सातारा, सगळी, कोल्हापूर<br>**सी.**- जालना, बीड, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली |
| १६ | गूळ | **ए** - कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, **बी-** लातूर |
| १७ | मसाले (ए. लाल मिरची) | **ए** - नागपूर ,**बी.**- नंदुरबार,**सी.**- बुलडाणा, |
| १८ | मसाले (बी. हळद) | **ए** -सांगली, सातारा,**बी.**- वर्धा, वाशिम, यवतमाळ,<br>**सी.** -हिंगोली, नांदेड, परभणी |
| १९ | दुग्ध उत्पादने (दूध,पनीर, स्किम्ड मिल्कपावडर, केसिन इ.)-उत्तर पुणे, अहमदनगर, सातारा,<br>सांगली, कोल्हापूर,सोलापूर | |
| २० | मत्स्यपालन | अ. ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी,सिंधुदुर्ग |
| २१ | प्राणी उत्पादने (पोल्ट्री) आणि पोल्ट्री उत्पादने, शेळी,म्हशी, मेंढी, डुकराचे मांस) | **ए** - जळगाव, अहमदनगर, नाशिक, पुणे, सोलापूर,<br>**बी.**- यवतमाळ,अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली,बुलढाणा,नागपूर<br>**सी.**- नांदेड, औरंगाबाद, बीड, |